# जैन दर्शन

अवैदिक दर्शन

# पार्श्वभूमी

- १. सर्वात प्राचीन दर्शन
- २. जीन = ज्याने इंद्रियांवर  मिळवला आहे.
- ३. जैन  = ' जीन ' चे अनुयायी
- ४. एकूण २४ तीर्थंकर. वृषभदेव पहिले, पार्श्वनाथ तेवीसावे तर महावीर वर्धमान चोविसावे.
- ५. तीर्थंकर म्हणजे धर्मप्रसारक, धर्माचे संस्थापक नव्हे.

# अनेकांतवाद

- प्रत्येक व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकांतिक असतो.
- व्यक्तीला जग जसे वाटते किंवा भासते तसे तो जग समजत असतो.
- जगाकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन असतात.
- जगाच्या  ज्ञानाला अनेक अंत,कडा ,किंवा टोक असतात
- जगाकडे पाहण्याचे समग्र दृष्टिकोन विचारात घेणे म्हणजे अनेकांतवादाचा स्वीकार करणे होय

अनेकांतवादी दृष्टी ज्ञानाच्या अनुषंगाने वापरली की त्यास नयवाद म्हटले जाते. नयवाद मुख्यत्वे दोन प्रकारचा असतो. १. द्रव्यनय  २. पर्यायनय

अनेकांतवादी दृष्टी विधानांच्या  अनुषंगाने वापरली की त्यास स्यादवाद म्हटले जाते. स्यादवाद मुख्यत्वे सात प्रकारचा असतो. त्यास सप्तभंगी नय असेही म्हटले जाते.

# जैनांचे सत्ताशास्त्र

- १. सत किंवा द्रव्याचे दोन मुख्य प्रकार आहेत.
  जीव आणि अजीव
- २. जीव म्हणजे जाणीवरूप द्रव्य. जीवांचे अनेक प्रकार मान्य.
- ३. अजीव म्हणजे जाणीव नसणारे द्रव्य. अजीवाचे पाच मुख्य प्रकार आहेत.
  पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल.
- ४. धार्मिक दृष्ट्या जैनांनी सात तत्वे मानली.
  आस्रव, पुण्य ,पाप, बंध ,संवर ,निर्जरा,मोक्ष.

# जैनांचे नीतिशास्त्र (रत्नत्रयी)

- १. सम्यक दर्शन - तीर्थंकर सर्वज्ञ होते ,त्यांनी प्रतिपादन केलेल्या सात तत्त्वांवर श्रद्धा ठेवणे
- २. सम्यक ज्ञान - जीव अजीवाचे सविशेष व निर्दोष ग्रहण करणे.
- ३. सम्यक चरित्र - म्हणजे सद्वर्तन . यात पाच व्रते (अहिंसा,सुनृत ,अस्तेय,ब्रह्मचर्य,अपरिग्रह), पाच समिती व तीन गुप्तीचा समावेश होतो.